## जनसंपर्क विभाग

**बातमी क्र.१**

जळगाव दि. २ ( ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे प्रशासकीय विभाग / शैक्षणिक प्रशाळा दिवाळी निमित्त दि.५ नोव्हेंबर ते १० नोव्हेंबर, २०१८ या कालावधीत बंद राहतील याची सर्वांनी नोंद घ्यावी असे आवाहन कुलसचिव श्री.भ.भा.पाटील यांनी कळविले आहे.

---

**बातमी क्र.२**

जळगाव दि. २ ( ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात १३ नोव्हेंबर पासून पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ टेबल टेनिस (महिला) स्पर्धांना प्रारंभ होणार आहे.

१३ ते १६ नोव्हेंबर दरम्यान होणाऱ्या या स्पर्धेत महाराष्ट्र, गुजरात, गोवा, राजस्थान, मध्यप्रदेश या पाच राज्यांमधील ६९ विद्यापीठांचा सहभाग असणार आहे. यामध्ये ३५० खेळाडू, १४० व्यवस्थापक/प्रशिक्षक आणि २० पंच अशा एकूण ५१० जण विद्यापीठात येणार आहेत. १३ रोजी सकाळी या स्पर्धेचे उद्घाटन होईल. रोज सकाळी ७.३० ते १.०० आणि दुपारी २.०० ते रात्री ८ या वेळेत होणाऱ्या या स्पर्धेत पहिले तीन दिवस बाद फेरीतील सामने होतील. त्यानंतर साखळी सामने होणार आहेत.

विद्यापीठाच्या इनडोअर हॉलमध्ये या स्पर्धा होणार असून स्पर्धेची जय्यत तयारी सुरु आहे. स्पर्धेसाठी विविध प्रकारच्या समित्यांचे गठण करण्यात आले असून कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील, प्र-कुलगुरु प्रा.पी.पी.माहुलीकर, व्यवस्थापन परिषद दिलीप पाटील, कुलसचिव भ.भा.पाटील यांच्या उपस्थितीत समित्यांच्या कामांचा आढावा देखील यापूर्वी घेण्यात आला. विद्यापीठाच्या परिसरात या सर्व महिला खेळाडूंची निवास व्यवस्था करण्यात आली आहे.

चार गटांमध्ये संघांची विभागणी करण्यात आली असून `अ` गटात १३ नोव्हेंबर रोजी पहिला सामना प्रवरा इन्स्टिटयूट ऑफ मेडिकल सायन्सेस्, लोणी विरुध्द गोविंद गुरु ट्रायबल विद्यापीठ, बनसवारा (राजस्थान) यांच्यात होणार आहे. पहिल्या दिवशी या चार गटांमध्ये ४५ सामने होणार आहेत अशी माहिती क्रीडा संचालक व संयोजक सचिव डॉ.दिनेश पाटील यांनी दिली.

---

जा.क्र. : कबचौउमवि/16/हस्तदेय /2018 दिनांक : 2 नोव्हेंबर, 2018

प्रति,

**मा. संपादक / प्रतिनिधी,**

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या दैनिकातून प्रसिध्द करण्यात यावी, ही विनंती.

आपला विश्वासू,

स्वाक्षरीत प्रत/-

जनसंपर्क अधिकारी यांच्या करिता